## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :५०४/२०२२/धुळे**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. भटु झावरु पाटील,<br>रा. मु. पो. जी.टी. बापुजी कॉलनी,<br>प्लॉट नं.४७, अ/२, देवपुर, धुळे,ता.जि.धुळे. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, थाळनेर,<br>ता. शिरपूर, जि. धुळे. |

**सुनावणी दिनांक २२/०२/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक ०६ /०९/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २२/०२/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक ०६/०९/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी दि. १९/०३/२०१९ रोजी दिलेल्या उत्तरानुसार मालमत्ता क्र. १४२५अ मधील सामाईक वापर बाबतची नोंद रद्द करण्याबाबत अर्ज देऊनही उत्तर देत नाही.

३) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, तक्रारदार यांचा दि. ०६/०२/२०१९ चा माहिती अर्ज दि. १४/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी संबंधित कार्यालयाकडे (ग्रामपंचायत थाळनेर) वर्ग केले. तसेच जन माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक थाळनेर यांनी दि. १९/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध माहिती दिलेली आहे.

४) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत प्रकरणी आयोगास सादर केलेले अभिलेख विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांची कार्यवाही योग्य आहे. त्यामुळे सदरची तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक ५०४/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र मा-३००४ 04 OCT 2024